कविता

## हे क्रांतीच्या माये!

सर्वत्र काळोख व्यापलेला
धूर्त भूदेवांनी धर्माच्या नावे
अतार्किक, अवैज्ञानिक, अविवेकी,
बनावट, थोतांडी, मतलबी,
कपोलकल्पित भाकड गोष्टी
पसरवून ठेवलेल्या सहस्रो
धर्मग्रंथाच्या पानापानातून
त्यामध्ये रंगून दंगून गेलेले
मन नि मेंदू शूद्रातिशूद्रांचे
कायम लॉक करवलेले
आणि
पुरुषी कामवासनेच्या विकृत पूर्तीसाठी
कितीही बायका करावयास लावणारी
प्रतिष्ठित रावबाजी श्रीमंती
स्त्रीदेहमनाची अशी घनघोर विटंबना
चालवलेली बिनबोभाट

हे सावित्रीमाये!
अशा विदारक भोवतालात तू आलीस
जोतीबाची अर्धांगिनी बनून
नि पाहता पाहता
भूदेवांच्या नगरीला कवेत घेऊन
पुण्यवान झालीस

किती सोसलेत घाव घणाघाती
किती गिळलीस अपमानाची माती
किती उपसून काढलास
या पुण्यनगरीतला नरक
याच्या नोंदी आहेत आमच्या मेंदूत
कोरून ठेवलेल्या
या देशाच्या अख्ख्या समाजाचे अर्धांग
अवघे झाले आहे विकल निःसत्त्व
शिक्षणाच्या अमोघ शस्त्रानेच नष्ट होईल
या अर्धांगाचे युगायुगाचे पंगुत्व
हे सत्य तू अगदी कोवळ्या वयात जाणलेस
आणि त्या अर्धांगाच्या समग्र अस्तित्वासाठी
केलेस स्वतःला सज्ज
अविद्येसोबतच्या लढाईसाठी

जोतीबाच्या जीवनात आलीस तेव्हा
तू होतीस ठार अक्षरशत्रू
जोतीबाच्या साथीने झालीस अक्षरमित्र
तू करारी नि जिद्दीही
हाती घेतलेल्या कार्यातून कधी माघारली नाहीस

पहिली मुलींची शाळा जोतीबांनी काढली
भूदेवांच्या बालेकिल्ल्यात भिडेवाड्यात
सनातन्यांच्या धाकाने कोणी शिक्षक मिळेना
तेव्हा तू कंबर कसलीस शिक्षिका झालीस
या देशातील पहिल्या शाळेची
पहिली शिक्षिका तू एकमेव
अगदी तारुण्यात किती धाडसाने टाकलेस पुढे
पाऊल
सनातन्यांनी तुझे स्वागत केले शेण-दगडांनी
तेव्हा तू किती करुणेने वदलीस
-''माझ्या लहानथोर बंधुंनो

मी आपल्या थाकट्या भगिनींना शिकविण्याचे
पवित्र कार्य करीत आहे. मला उत्तेजन देण्यासाठी
आपण माझ्यावर शेण-दगड फेकीत नसून
फुले उधळीत आहात''-
तुझा भाव असा दृढ नि निश्चल
शेण-दगडांची फुले करणारा

जोतीबाच्या क्रांतिकार्याने बेजार झालेल्या
सनातन्यांनी रक्ताच्या सग्यांना
हाताशी धरून तुम्हाला बेघर केले
तेव्हा रक्ताच्या नसलेल्या
उस्मानशेख-फातिमा शेख या भावाबहिणीने
रक्तबंधाहूनही दिले बंधूप्रेम
निस्सिम स्नेहार्दाने
तेव्हा तुझ्या उजाड संसाराचे बस्तान बसले

तू जोतीबासह उपेक्षित जगाचा
संसार इमाने नि नेटाने सांभाळलास
जोतीबाच्या सक्षम रथाचे चाक बनून
हाकत राहिलीस अथक
जागतिक स्त्री इतिहासात
तू ठरली आहेस या विश्वाचे मिथक

हे विद्येच्या माये!
अविद्येच्या लढाईत
तू किती एकमय झाली होतीस
- ज्या सामाजिक स्थितीतून मुले-मुली येतात
त्याचा बरावाईट परिणाम होत असतो त्यांच्यांवर-



शिक्षणशास्त्राचा हा आधुनिक सिद्धांत
शाळेत शिकवता शिकवता विषद केलास
खरेच तू नव्हतीस केवळ शिक्षिका
उपेक्षितांच्या कल्याणाचे तत्त्ववेत्तेपण
होते तुझ्यात सामावलेले

तुझी अवघी तरुणाई ठरली
तुझ्यासाठी अविद्येचे रणांगण
नि पाहता पाहता
निर्माण केलेस विद्येचे विशाल प्रांगण
अवघ्या समाजाला मानलेस तू
तुझी खरीखुरी संतान
त्यांच्या मानेभोवतीचे तोडलेस पाश
पोसलेस वात्सल्याने बालहत्याप्रतिबंधकगृह
नि भुकेल्यांना घातलास मायेचा घास
हलविलेस कित्येक जणींचे पाळणे
ओटीत घेतलेस मायेने
नि काळजाशी धरलेस
काशीबाईच्या जायज यशवंतास

तू अशी सर्वत्र सामावलीस
तुझ्या देशातील समस्त स्त्रियांचे विकल अर्धांग
बघ कसे भक्कमपणे उभे आहेत स्वतःच्या पायावर
सहा मुलींपासून तू उभारलेला हा विद्येचा मळा
सर्वत्र फुलतो आहे बहरतो आहे
ही सर्व तुझ्याच सोसण्याची मधूर फळे आहेत
तरीही हे मान्य करायला विसर पडतो
शिकल्यासवरल्या वटसावित्रीच्या लेकींना
पण तुझ्या आठवणींना उजाळा मिळतो दूरदेशी
वंचित-उपेक्षित भगिनी आजही समूहाने उच्चारतात
'आम्ही सावित्रीच्या लेकी!'
नि हाणून पाडतात भूदेवांची सांस्कृतिक बेकी

हे माये!
तू तपतप तपलीस
तुझ्या तपण्यातून
झळाळले आहे जोतीबाचे तेज
सारे माहात्म्य, सारे धैर्य
जोतीबाचे आहे तुझ्याचमुळे
पोरक्या मुलांचा प्रतिपाळ
दुष्काळी अन्नछत्रालयाचा सांभाळ
शेतमाल देखरेख-अनाथ वसतीगृह-बालकाश्रम-
प्रसुतिगृह
किती कष्टलीस किती साहिलास हा प्रचंड डोलारा
नि मनोबल प्रबळ ठेवून
जुनाट चालीरीती-परंपरा-निर्बंध पायदळी तुडवून
पुढेच निघालीस
खरेच तू कापलेले अंतर आहे
केवळ देदीप्यमान एकमेव
स्त्री जातीच्या इतिहासात
तू ठरली आहेस एकमेवाद्वितीय
-'शूद्रांना सांगण्याजोगा आहे शिक्षणमार्ग हा
शिक्षणाने मनुष्यत्व पशुत्व हाटते पहा'-
वंचितांच्या दुःखावर तू सांगितलेला
हा मार्ग ठरला आहे सत्य एकमेव
आजच्या वर्तमानातही तुझ्याच मार्गावरून होत आहे
तुझ्या शूद्रातिशूद्र बांधवांचे मार्गक्रमण
हा तुझाच विजय आहे

हे माये!
जोतीबा तुझी प्रेरणा नि तू जोतीबाची
तुझ्या भोवतालाच्या तमोयुगात
ज्योत पेटविलीस तू रक्ताचे तेल करून
नि झालीस क्रांतीची ज्योती
अक्षराअक्षरामधून उगवलेस मोती
तुझे बीज कसदार आणि
त्याला मिळाली कसदार माती
या भूमीतील शूद्रातिशूद्र
बघ कसे गीत विद्येचे गाती
हे क्रांतीच्या माये!

**प्रभाकर**
**गंभीर**
अमरावती
prabhakargambhir@gmail.com